सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.३७४(२)/विद्युत/२०१९/१४-ब** **दिनांक २७ ऑगस्ट, २०२१**

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ अंतिम निकाल**

**संदर्भ :- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १८/२०१९**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता, विद्युत, गट-ब, श्रेणी-२ या संवर्गाच्या १६ पदांकरिता दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियात्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परिक्षेचा अंतिम निकाल दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत पुणे जिल्ह्यातील श्री. पवार सुरज हरिदास (बैठक क्रमांक- MB००१०७४) हे राज्यातून प्रथम आले असून औरंगाबाद जिल्ह्यातील श्रीमती बनकर शामल अंकुश (बैठक क्रमांक- MB००१०३६) या महिला वर्गवारीतुन प्रथम आल्या आहेत. तसेच पालघर जिल्ह्यातील श्री. ठाकरे संकेत अजित (बैठक क्रमांक- MB००११६१) हे मागासवर्गीयामधून प्रथम आले आहेत.

**२.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित ०२ पदांचा निकाल प्रमाणपत्र तपासणीनंतर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांची शिफारस त्यांच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे दावे प्रमाणपत्राआधारे तपासणी केल्यानंतर शासनास करण्यात येईल.

**३.** उमेदवारांच्या माहितीसाठी शिफारसयादी व वर्गवारीनिहाय (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक वगळता) शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off Marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आरक्षित ०२ पदांचा निकाल जाहिर झाल्यानंतर संपूर्ण गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**४.** प्रस्तुत निकाल विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**५.** प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव,परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**